महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिसं/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२२-२३/ 3328 दिनांकः- 18 OCT 2022

प्रति,

प्राचार्य /संचालक,

शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :-**डीबीटी पोर्टलव्दारे शैक्षणिक वर्ष 2022-23 विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याबाबत.**

संदर्भ :- मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/ विकाप /२०२२-२३/ २४४/ दि. २९ /०९ /२०२२

आपले सरकार महाडिबीटी पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना .

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया **दि. 21 सप्टेंबर २०२२ पासून** सुरु करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता आपल्या संस्थेतील शिकणा-या उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवरील अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन घेण्याबाबत संस्थास्तरावरुन विद्यार्थ्यांना सुचना देण्यात यावे. व संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज, संस्थेला दिलेल्या दोन्ही लॉगीन मधून संबंधित योजनेंच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून वेळोवेळी अचुक पात्र असलेले अर्ज मंजूरीस्तव पाठविण्यात यावे. आपण पाठविलेले अर्ज संबंधित योजनेंकरिता पात्र नसल्याचे आढळल्यास, तर असे अर्ज परत (Revert) न करता विभागीय स्तरावरील आपणास कोणत्याही प्रकारची सुचना न देता थेट नामंजूर करण्यात येईल, याची सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

**महत्तवाची सुचना :-**

1. संस्थांनी डीबीटी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून Institute Profile अद्ययावत करावी.
2. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेंसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना उपरोक्त योजनांबाबतची तसेच संबंधित योजनेंतर्गत शिष्यवृत्तीस आवश्यक असलेले कागदपत्राची माहिती निदर्शनास आणून द्यावी. जेणेकरून कोणताही पात्र विद्यार्थी योजनेंच्या लाभापासून वंचित राहणार नाही.
3. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनाचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वतः- योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त् झालेले अर्ज संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**
4. विद्यार्थ्यांने एकाच वर्षाकरिता दोन-दोन शिष्यवृत्ती योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा) लाभ प्राप्त् करून घेतल्यास **किंवा**
5. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेंकडून मंजूरी दिल्यास **किंवा**

6. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखाची राहील. याची नोंद घ्यावी.

**टिप:- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज (Institute Login & Student Login ) ला प्रलंबित असल्याचे निर्दशनास येईल, त्या संस्थांचे महाडिबीटी पोर्टल वरील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील मंजूरी करिता (Approval) पाठविण्यात आलेली फी या कार्यालयामार्फत मंजूर करण्यात येणार नाही .**

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर